मिरा – भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दिनांक 19/6/2003.

ठराव क्र. : ~~२७~~ १८

प्रकरण :– २७ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 382 व 386 अन्वये महानगरपालिका हद्दीतील मांस विक्रीस परवानगी देणेबाबत.

मिरा–भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जवळ जवळ 55 लहान जनावरांचे व 22 मोठया जनावरांचे मांस विक्रीची, कोंबडी मांस विक्री 92 दुकाने आहेत. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 382 अन्वये शहरात किंवा कोणत्याही कत्तलखान्यात खाटकाचा व्यवसाय चालविता येत नाही. शहरातील कोणतीही जागा कोणत्याही जनावराच्या मांसाची विक्री करण्यासाठी किंवा शहराबाहेरील कोणतीही जागा शहरात खपविण्यासाठी अशा मांसाची विक्री करण्यासाठी परवानगीशिवाय वापरता येत नाही. कलम 386 अन्वये महानगरपालिका क्षेत्रात कोणताही व्यवसाय आयुक्तांचे परवानगीशिवाय किंवा कलम 69 अन्वये अधिकार देण्यात आलेल्या अधिका–याच्या परवानगीशिवाय चालविता येत नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही मांस विक्री दुकानास परवानगी नाही, त्यामुळे ती बंद करण्याची कार्यवाही करून त्यांना नियमानुसार परवानगी देणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्रात कतलखान्याची सुविधा उपलब्ध करून न दिल्यामुळे लहान जनावरांचे मांस विक्री करणारे खाटीक त्यांच्या जागेतच बोकड व मेंढ्या यांची कत्तल करतात. मोठया जनावरांचे मांस विक्री करणारे व्यावसायिक मुंबई व ठाणे किंवा इतर महानगरपालिकेच्या कत्तलखान्यातून कत्तल केलेल्या जनावरांचे मांस आयात करून विक्री करतात.

महानगरपालिका क्षेत्रात खाटीक व मांस विक्रीची परवानगी देतांना मुख्यतः खालील बाबींची पूर्तता झाल्याशिवाय त्यांच्या अर्जाचा विचार करण्यात येऊ नये.

1) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम 1949 अन्वये दुकानाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

2) मांस विक्री केल्या जाणा–या जागेचा संपूर्ण पत्ता, मालकाचे नाव, व त्यासाठी जागा भाडयाची असेल तर कायदेशीर करारनामा.

3) मांस विक्री दुकानाची जागा खाजगी अथवा महानगरपालिकेच्या मंडईपासून 100 मिटरच्या आत नसावी.

4) मिरा–भाईंदर महानगरपालिका हद्दीत अर्जदाराचे नांवावर मांस विक्री साठी दुसरा परवाना नसावा.

5) स्वच्छतेच्या दृष्टीने जागा योग्य असावी व दुकानात स्वच्छता ठेवावी.

6) दुकानांत काम करणा–या व्यक्तिंनी योग्य वैयक्तिक स्वच्छता राखावी.

7) दुकानाच्या जागेपासून 20 मीटर अंतराचे आत दुभत्या जनावरांचा किंवा बैलांचा गोठा

सत्य प्रत

प्र. नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

9) दुकानाच्या जागेपासून 5 मीटर अंतराचे आत केस कापण्याचे दुकान, पिठाची गिरणी, कोळशाचे दुकान नसावे.

10) दुकानापासून 50 मिटरचे आत मंदिर किंवा धार्मिक स्थळ नसावे.

11) दुकानाचा आकार कमीत कमी 65 ते 70 चौ. फुटांचा असावा.

12) दुकानात पाण्याची योग्य व्यवस्था असावी.

13) दुकानात सर्व भिंतीना कमीत कमी 4 फूट टाईल्स लावलेल्या असाव्यात.

14) दुकानातील मांस रस्त्यावरून जाण-या नागरिकास दिसणार नाही यासाठी दुकानासमोर टांगू नये. दुकानाच्या दर्शनी भाग काळया काचा किंवा पत्रा यांनी बंद करावा.

15) दुकानातील घाण व कचरा स्वतंत्र डब्यात तो महानगरपालिकेच्या घंटा गाडीत टाकावा.

16) ज्या इमारतीत मांस विक्री दुकान सुरू करावयाचे आहे त्या इमारतीच्या रहिवाशाचे ना हरकत प्रमाण पत्र.

17) मांस विक्री दुकानदाराने नागरिकांचे आरोग्यास कोणताही अपाय होणार नाही अशी कृती करू नये.

महानगरपालिका हद्दीत लहान व मोठया जनावरांचे तसेच कोंबडी कापून मांस विक्री करणा-या याशिवाय शीत पेटीतून मांस विक्री करणा-या दुकानास परवानगी देतांना खालीलप्रमाणे दर आकारण्यात यावे. अशी शिफारस आहे.

1) मोठया जनावरांचे मांस विक्री व्यवसाय रूपये 3000 /- नुतनीकरण फी रूपये 1500/-

2) लहान जनावरांचे मांस विक्री व्यवसाय रूपये 2000/-नुतनीकरण फी रूपये 1000/-

3) कोंबडी कापून त्याचे मांस विक्री व्यवसाय रूपये 1500/- नुतनीकरण फी रूपये 500/-

4) खाजगी जागेत शीतपेटीमध्ये मांस व मासळी ठेवून विक्री करणे.
रूपये 1000/- नुतनीकरण फी रूपये 500/-

महानगरपालिकेच्या हद्दीत बाहेर अधिकृत कत्तल केलेल्या कत्तल खान्यात कापलेल्या मोठया व लहान जनावरांचे मांस मिरा-भाईदर महानगर पालिका हद्दीमध्ये आयात करून विक्री करणे व वार्षिक फी रू. 10,000/- अशा दुकानदारांची त्यांनी रोज आयात केलेल्या मांसाची अधिकृत कत्तल खान्यात कापल्याबाबतची प्रत्येक दिवसाची पावती त्यांचे दुकानात पहाण्यासाठी ठेवावी व महानगरपालिका मागेल तेव्हा सादर करावी.

जे दुकानदार महानगरपालिकेच्या लेखी परवानगीशिवाय मांस विक्रीचा व्यवसाय करतील त्यांची दुकाने बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल. अशी ही सभा ठरवित आहे.

सुचक : श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक : श्री. प्रेमनाथ पाटील

महापौर
मिरा-भाईदर महानगरपालिका.

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका.